**कृपया प्रसिद्धीसाठी** **5 डिसेंबर 2011**

## भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी मुंबई येथे सोमवार, 5 डिसेंबर रोजी पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *पुनर्वसनाच्या दिशाभूल करणा-या जाहिरातींवर एक कोटी खर्च तारापूर प्रकल्पग्रस्त संतप्त*

**मुंबई, सोमवार :**''तारापूर अणु ऊर्जा प्रकल्पग्रस्तांचे ख-या अर्थाने पुनर्वसन न करता संपूर्ण पान रंगीत जाहिराती देऊन न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशनने (एनपीसी) प्रकल्पग्रस्तांच्या दुःखावर मीठ चोळले आहे. या जाहिरातीद्वारे एनपीसीने जनतेची दिशाभूल केली आहे, इतकेच नव्हे तर सार्वजनिक पैशांचा दुरुपयोगही केला आहे,'' अशी तीव्र प्रतिक्रिया भारतीय जनता पार्टीचे नेते आणि तारापूर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मुंबईच्या उच्च न्यायालयामध्ये गेली सात वर्षे लढा देणारे श्री.राम नाईक यांनी दिली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

श्री. राम नाईक त्यांच्या विरोधाबद्दल तपशील देताना म्हणाले,''तारापूर संयंत्र 3 व 4 मधून एकूण 1,080 मेगॅवॅट अणु ऊर्जेचे उत्पादन गेली पाच वर्षे होत आहे. मी नियोजन व कार्यक्रम अंमलबजावणी खात्याचा राज्यमंत्री असताना या प्रकल्पाचे भूमीपूजन माझ्याच हस्ते ऑक्टोबर 1998 मध्ये झाले होते. या प्रकल्पामुळे अक्करपट्टी आणि पोफरण या दोन गावांतील मुख्यतः शेतकरी आणि मच्छिमार असलेली 1,250 कुटुंबे विस्तापित झाली तसेच 170 हेक्टर जमिनीचे भूसंपादनही करावे लागले. प्रकल्पग्रस्तांना जमिनीसाठी जमीन देण्यात येईल, नवी घरे बांधून देण्यात येतील तसेच ख-या अर्थाने त्यांचे पुनर्वसन होईल असे आश्वासन नियोजन खात्याचा मंत्री म्हणून मी दिले होते. त्याचबरोबर पंतप्रधान मा. अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळानेही प्रथमतःच वर्ष 2003 मध्ये प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे धोरण निश्चित केले. या सर्व पार्श्वभूमीवर स्थानिक नागरीकांनी सहकार्य दिले आणि प्रकल्पाचे काम कोणतीही अडचण न येता वेगाने सुरु झाले. परंतु सरकार बदलले, डॉ. मनमोहन सिंह पंतप्रधान झाले आणि डिसेंबर 2004 मध्ये त्या दोन्ही गावांतील गावक-यांची पुनर्वसन पूर्ण न करताच पोलीस बळ वापरुन सक्तीने हकालपट्टी करण्यात आली. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्यावतीने मुंबई उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करुन गेली सात वर्षे मी स्वतः या प्रकरणी न्यायालयात प्रकल्पग्रस्तांची बाजू मांडीत आहे. आता न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांची घरे बांधून देण्यात आली आहेत. तथापि, अजूनही 433 मच्छिमारांना मच्छिमारीसाठी समुद्र किनारी जमीन न मिळाल्याने उदरनिर्वाहाचे साधन नाही. परिणामी त्यांची अक्षरशः उपासमार होत आहे. तसेच शेतक-यांना जमिनीसाठी जमीन देण्याचे मान्य करुनही अद्याप जमिनीचे वाटप झालेले नाही.''

''प्रकल्पग्रस्तांनी अडथळे निर्माण न केल्यामुळे याच कालावधीत संयंत्र क्र. 4 मधून सप्टेंबर 2005 पासून म्हणजेच नियोजित उद्दिष्टाच्या 230 दिवस आधीच आणि संयंत्र क्र. 3 मधून ऑगस्ट 2006 पासून म्हणजेच नियोजित उद्दिष्टाच्या 166 दिवस अगोदर प्रत्येकी 540 मेगॅवॅट प्रमाणे 1,080 मेगॅवॅट वीज मिळण्यास प्रारंभ झाला. हे जे 396 दिवस वाचले त्याची बचत रुपयांमध्ये रु. 396 कोटी म्हणजेच रु.400 कोटी होते. त्याचप्रमाणे या प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च रु. 6,525 कोटी होता, त्याऐवजी प्रत्यक्ष खर्च रु. 6,100 कोटी झाला म्हणजेच रु.425 कोटी वाचले. त्यामुळे वेळेतील बचत व खर्चातील बचत मिळून एनपीसीची एकूण रु.825 कोटींची बचत झाली. जल आणि विद्युत प्रकल्प निर्मितीसाठी प्रकल्प खर्चाच्या 5 टक्क्यांपर्यंत पुनर्वसनावर खर्च होऊ शकतो असा संकेत आहे. म्हणजेच रु.6,100 कोटींच्या प्रकल्पासाठी रु.305 कोटी रुपये पुनर्वसनावर खर्च करता येतील. मात्र एनपीसीने वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार अवघे रु. 86 कोटीच पुनर्वसनावर खर्च करण्यात आले हे स्पष्ट आहे. म्हणजेच अजून रु.219 कोटी खर्च होऊ शकतात. तरीही एनपीसी, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र सरकार ख-या अर्थाने पुनर्वसन करण्यास तयार होत नाहीत हे स्पष्ट दिसत आहे. ख-या अर्थाने पुनर्वसन व्हावे यासाठी आम्ही उच्च न्यायालयात लढत आहोत.

''वृत्तपत्रात देण्यात आलेल्या जाहिरातीचे आता औचित्य काय हे अनाकलनीय आहे. प्रकल्पपीडितांच्या न्याय्य हक्कांसाठी एनपीसी खर्च करत नाही आणि वृत्तपत्रांतील पूर्ण पानी रंगीत जाहिरातींवर मात्र सुमारे एक कोटी रुपयांची ही उधळपट्टी संतापजनक आहे.'' अशी टीका श्री. राम नाईक यांनी केली. ''या जाहिरातीत तारापूर प्रकल्पातून देशाला 1,080 मेगॅवॅट वीज गेली पाच वर्षे मिळते आहे याचा साधा उल्लेखही करण्यात आलेला नाही,'' असेही श्री. राम नाईक शेवटी म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**